# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.८/२०२४** **दिनांक २४/०७/२०२४**

**स्थळ-जिल्हा न्यायालय, अहमदनगर** **वेळ- दुपारी १२.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची विशेष सभा **बुधवार दि.२४.०७.२०२४ रोजी दुपारी १२.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर** येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.क्र.स्वी.स./११४/२०२४,जिल्हा न्यायालय,अहमदनगर दि.२३.०७.२०२४ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा **बुधवार दि.२४.०७.२०२४ रोजी दुपारी १२.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर** येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी हे ऑनलाईन उपस्थित होते.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. सुहास मापारी,**
**प्र.जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१** **श्री साईबाबा महाविद्यालयात (Ad-hoc) सहा.प्राध्यापक, ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक यांचे मानधन वाढीबाबत.**

**निर्णय क्र.४६३** **वार्षिक वाढीव खर्च पन्नास लाखाचे आत असल्याने सी ए दाखल करण्याची आवश्यकता नाही. प्रस्तावातील तक्ता ‘अ’ प्रमाणे प्रस्ताव मंजुर. सुधारीत मानधन माहे**

जुलै,२०२४ पासुन देण्यात यावे. (कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय)

---

**विषय नं.२** श्री साईबाबा शैक्षणिक संकुल (निमगाव को-हाळे) येथील इमारती व ऑडीटोरीयम या ठिकाणी शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाकरीता आवश्यक संगणकीय नेटवर्कची उभारणी करणेकामी येणारे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.४६४** चर्चा केली, श्री.अनिल शिंदे, इनचार्ज, आय.टी.विभाग यांनी निवेदन केले की, या प्रस्तावामध्ये उल्लेख केलेल्या दरामध्ये पाच वर्षाचा मेंन्टनन्स खर्च समाविष्ट आहे. त्यामुळे निविदेमध्ये तसा उल्लेख करण्याची अट टाकून प्रस्ताव मंजुर. सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग/विधी विभाग)

---

**विषय नं.३** मौजे शिर्डी येथील संस्थान मालकीचे सर्व्हे नं.५४,५५ मध्ये साईभक्तांचे सोयीसाठी तात्पुरत्या स्वरुपात वाहनतळाची व्यवस्था सुरु करणेबाबत.

**निर्णय क्र.४६५** खर्चाच्या तपशिलासह प्रस्ताव चक्रिय पध्दतीने सादर करावा.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग/बांधकाम विभाग)

---

**वरील निर्णय क्र.४६३ ते ४६५ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर दुपारी १.०० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत-
**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत-
**(सुहास मापारी)**
**प्र.जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**